# अकोले ते श्रीरामपूर पट्ट्यात २०० बिबटे

## अकोलेत ३००० डुकरे तर २०० कुत्री

**अकोले (प्रतिनिधी)**– अकोले तालुक्यातील रुंभोडीपासून श्रीरामपूरपर्यंतच्या ऊसक्षेत्र असलेल्या प्रवरा पट्ट्यात २०० बिबटे असल्याचा अंदाज बिबट्याच्या प्रश्नाच्या अभ्यासक विद्या अत्रेया यांनी व्यक्त केला आहे. बिबट्यांना पकडून दुसरीकडे सोडून देण्याच्या प्रचलित पद्धतीने बिबट्यांचा हा प्रश्न सुटणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

बेंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्सच्या सहकार्याने सन २००७ पासून बिबट्यांच्या प्रश्नांसंदर्भात अकोले तालुक्यात श्रीमती अत्रेया यांनी काम सुरु केले आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे दोन वर्षात बिबट्याने ५० लोकांवर हल्ले केले होते. तेव्हापासून आपण वन्यजीव प्राण्यांविषयी अभ्यास सुरु केला. अकोले तालुक्यातील रुंभोडी ते धृव ॲकेडमी या ३०० चौरस किलोमीटर अंतरावरील ऊस क्षेत्रात १२ बिबटे कॅमेऱ्यात आढळून आले असून त्यामध्ये चार बछड्यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. रुंभोडी ते श्रीरामपूरपर्यंतच्या ऊस क्षेत्रात असलेल्या प्रवरा पट्ट्यात उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. बिबट्याची विष्ठा काही ठिकाणी आढळून आली. अकोल्यात तीन हजार डुकरे, २०० कुत्री असल्याचा सर्व्हे करण्यात आला आहे. बिबट्या खावून गेलेली काही डुकरेही



अकोल्यात आढळून आली आहेत. बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या जनावरांची नुकसान भरपाई लवकर मिळत नाही. गोरगरीब माणसांना शेळी, बकरी, मेंढी यांचे नुकसान झाल्यावर तीन तीन वर्ष संबंधीत विभागाकडून नुकसान भरपाई मिळत नाही. आठवडाभरात संबंधित विभागाकडून नुकसानग्रस्त कुटूंबियांस तातडीने अनपेक्षित मदत मिळावी तसेच शेतकऱ्यांना जनावरांसाठी शेड [illegible]

यासंदर्भात लोकप्रतिनिधींची भेट घेवून त्यांना बिबट्याच्या हल्ल्यांत मृत्युमुखी पडणाऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी व त्यांनी शासन दरबारी तसे प्रयत्न करावेत, असे आवाहन करणार असल्याचे सांगितले.

बिबट्या नर जातीचा असेल तर त्याचे वजन ६० किलोपर्यंत तर मादी ४० किलो वजनाची असते, असे त्यांनी सांगितले. बिबट्या एकदा जेरबंद केला तर दुसरा येतच राहिल. बिबट्याचा संघर्ष सुरुच राहणार आहे. बिबट्या हा स्वत:हून दुसऱ्याला त्रास देत नाही. मात्र त्यास धोका जाणवल्यास तो इतरांवर हल्ला करतो, असे त्या म्हणाल्या. मोकाट जनावरे कमी करणे, गावे स्वच्छ ठेवणे ही कामे बिबट्याच्या नियंत्रणासाठी करावे लागणार आहे असे श्रीमती अत्रेया म्हणाल्या.

माळीझाप येथील एक शेतकरी विजेचा आकडा टाकण्यासाठी घराच्या स्लॅबवर चढत असताना बिबट्या व मादी एकाच वेळी पायऱ्या चढून खाली येत होते. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याची त्रेधातिरपिट व तारांबळ झाल्याचे पहिल्याचे श्रीमती अत्रेया यांनी झालेल्या सर्वेक्षणात बिबट्यांबरोबरच १० तरस, लांडगे, दोन रानमांजरे आढळल्याचे त्यांनी सांगितले. बिबट्याचे मुख्य खाद्य कुत्रे, डुकरे, आणि शेळ्या-मेंढ्या असल्याचे त्यांनी सांगितले.

बिबट्या एकाच रात्रीतून १० ते १५ किलोमीटर प्रवास करु शकतो. उदाहरण देताना त्यांनी रेडे येथे रात्री कॅमेऱ्यात बंदिस्थ झालेला बिबट्या दुसऱ्या दिवशी आंबडच्या शिवारात कॅमेऱ्यात आल्याचे श्रीमती अत्रेया यांनी सांगितले.

अकोले शहरातच सात बिबटे आणि तेही शहराच्या मध्यवस्तीतून जात असल्याचे कॅमेऱ्यात दिसून आल्याचे त्यांनी सांगितले. बिबट्याच्या शोध मोहिमेसाठी भुलतज्ज्ञांमार्फत त्याला भुलीचे इंजेक्शन देवून बिबट्याच्या गळ्यात कॉलरआयडी बसवण्यात येतो. त्यानंतर त्याचा वावर किती किलोमीटरच्या परिसरात होतो याची उपग्रहाद्वारे माहिती घेण्यात येते. जुन्नर येथे सोडण्यात आलेला एक बिबट्या १०० किलोमीटर अंतर पार करून पुन्हा कुंभेफळ शिवारात आल्याचे कॉलरआयडीमुळे निदर्शनास